**१. सांसद आदर्श ग्राम योजना**

| अ.क्र. | बाब | योजनेची माहिती |
|---|---|---|
| **१** | **योजनेचे नाव** | सांसद आदर्श ग्राम योजना (SAGY) |
| **२** | **शासन निर्णय** | ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. व्हीपीएम - २०१४/ प्र.क्र./१८३/पंरा-३ दिनांक ३१ डिसेंबर २०१४. |
| **३** | **योजनेची उद्दिष्टे** | ग्रामीण भारताच्या मूळ स्वरुपाला बाधा न आणता, गावोगावी सगळया सुखसोई उपलब्ध करुन ग्रामस्थांना स्वत:चे भवितव्य स्वत:च ठरविण्याची संधी उपलब्ध करुन देणे, सक्षम आणि पारदर्शक पंचायती,ग्रामस्थांचा स्थानिक कारभारात सहभाग वाढवून लोकशाहीचे मुळे घट्ट करणे आणि चांगली शासन व्यवस्था निर्माण करणे इत्यादी. |
| **४** | **योजनेचे निकष-** | १) ३००० ते ५००० लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीची निवड करण्यात यावी.<br>२) ३००० ते ५००० लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीची यादी तयार करुन यादी तयार करुन मा. लोकसभा/राज्यसभा सदस्यांना ग्रामपंचायत निवडण्यासाठी सादर करावी.<br>३) ज्या ठिकाणी ग्रामपंचायत अस्तित्वात नाही अशा नागरी लोकसभा मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करणारे सांसद सदस्यांनी नजिकच्या जिल्हयातील ग्रामीण भागातील ग्रामपंचायतीची निवड करावी .<br>४) राज्य सभा सदस्य यांनी जिल्हयाची पसंती कळविल्यानंतर ग्रामपंचायतीच्या निवडीच्या कार्यवाहीसाठी कळविण्यात येईल. |
| **५** | **योजनेची कार्यपध्दती** | १) प्रत्येक सांसद सदस्यांनी आपल्या मतदार संघात वर्ष २०१६ पर्यंत एक आणि वर्ष २०१९ पर्यंत दोन अशी एकुण तीन आदर्श ग्राम विकसित करावीत अशी मा.पंतप्रधानांनी अपेक्षा व्यक्त केली आहे. |
| **६** | **लाभार्थी** | मा. खासदार महोदयांनी निवडलेली ग्रामपंचायत |
| **७** | **कार्यान्वीत यंत्रणा** | ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद गोंदिया |
| **८** | **निधीचे स्त्रोत** | केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार सन २०१४-१५ सांसद आदर्श ग्राम योजनेकरिता होणारा प्रशासकिय/कार्यालयीन खर्च केंद्र शासनाच्या ग्राम विकास मंत्रालया अंतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (MNREGA),राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्ती अभियान **(NRLM)** जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा(DRDA),इंदिरा आवास योजना(IAY) यासांरख्या योजनेमधून करण्या यावा. |

२. आमदार आदर्श ग्राम योजना

| अ.क्र. | बाब | योजनेची माहिती |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नाव** | केंद्र शासनाच्या सांसद आदर्श ग्राम योजनेच्या धर्तीवर राज्यात आदर्श आमदार ग्राम योजना राबविण्याबाबत. |
| २ | **योजनेचे उद्दिष्टे** | **१)** निवडलेल्या ग्रामपंचायतींचा सर्वांगिण विकास साधणाऱ्या प्रक्रिया गतीमान करणे, २) सर्व स्तरांवरिल कुटुंबाच्या जीवनमानाच्या आणि राहणीमानाच्या शाश्वत विकासाला मूर्तरुप देणे. ३) स्थानिक विकासाचे मार्गदर्शक म्हणून निवडलेल्या ग्रामपंचायतींना विकसीत होण्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन व सहाय्य पुरविणे. |
| ३ | **योजनेचे निकष** | **१)** ग्रामपंचायतीची लोकसंख्या किमान १००० असावी.<br>२) आमदारांना स्वत:चे वा आपल्या पतीचे/पत्नीचे गाव निवडता येणार नाही.<br>३) **विधानसभा सदस्यांचा** मतदार संघ जरी शहरी आणि ग्रामीण भागात विभागला गेला असेल तर ते मतदार संघाच्या ग्रामीण भागातून ग्रामपंचायतीची निवड करतील.<br>४) विधानसभा सदस्यांचा मतदार संघ जर पूर्णपणे शहरी असेल तर त्यांच्या सोयीच्या दृष्टीने त्याच जिल्हयातील एका ग्रामपंचायतीची निवड करु शकतील.<br>५) मुंबई परिसरातील शहरी मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करणारे विधानसभा सदस्य राज्यातील कोणत्याही ग्रामपंचायतीची निवड करु शकतील.<br>६) **विधानपरिषद सदस्य** त्यांच्या इच्छेप्रमाणे राज्यात कोणत्याही जिल्हयातून ग्रामपंचायतीची निवड करु शकतील. |
| ४ | **योजनेची कार्यपध्दती** | १) या योजनेत मुळ एकक ग्रामंचायत आहे. २) या योजनेअंतर्गत **जुलै, २०१९ पर्यंत तीन ग्रामपंचायती** आदर्श ग्राम म्हणून आमदार यांच्या मार्गदर्शनाखाली विकसित करणे. ३) एक ग्रामपंचायत निवडुन अमदारांनी जुलै, २०१७ पर्यंत पहिली ग्रामपंचायत विकसित करणे. ४) दुसरी ग्रामपंचायत सन २०१६ पर्यंत निवडुन जुलै, २०१८ पर्यंत विकसित करणे. ५) तिसरी ग्रामपंचायत सन २०१७ मध्ये निवडुन जुलै, २०१९ पर्यंत विकसित करणे. |
| ५ | **लाभार्थी** | मा. आमदार महोदयांनी निवडलेली ग्रामपंचायत |
| ६ | **कार्यान्वीत यंत्रणा** | ग्रामपंचायत, जिल्हा परिषद गोंदिया |
| ७ | **निधीचे स्त्रोत** | १) आमदार निधी - निवडलेल्या ग्रामपंचायती मध्ये आमदार निधीतून घेण्यात येणाऱ्या अनुज्ञेय असलेल्या कामासाठी राज्य शासनाकडुन जोड निधी देण्यात येईल. २) या योजनेच्या व्यवस्थापनाकरिता येणारा प्रशासकिय खर्च ग्राम विकास विभागाच्या राज्य योजनेअंतर्गत उपलब्ध नितव्ययामधून जास्तीत जास्त ०.५% मर्यादेमध्ये भागविण्यात येईल.३)निधीकरिता केंद्र योजनेतून, राज्य योजनेतून, तसेच इतर संसाधनांतून उपलब्धता-आमदार आदर्श ग्राम योजनेत निवडलेल्या ग्रामपंचायतींचा सर्वांगिण विकास केंद्र/राज्य व इतर योजना यांच्या कृतीसंगमातून साधावयाचा आहे. यासाठी पुर्णत: केंद्र/राज्य पुरस्कृत योजना, खासदार व आमदार स्थानिक विकास कार्यक्रम, केंद्र आणि राज्य वित्त आयोगांचे अनुदान,औदयोगिक आस्थापनांचा सामाजिक उत्तरदायित्व निधी (CSR) इ.स्त्रोतातून निधीची उपलब्धता करावी. |

**३) ग्रामपंचायतीच्या हद्दीतील रस्त्यावरिल पथदिवे.**

| अ.क्र. | बाब | योजनेची माहिती |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नाव** | ग्रामपंचायतीच्या हद्दीतील रस्त्यावरिल विजेचे खांब व दिव्यांच्या संख्येत वाढ करण्याचे प्रस्तावांस मंजुरी प्रदान करणेबाबत. |
| २ | **शासन निर्णय** | ग्रामविकास विभाग क्र. व्हीपीएम २०८५/सीआर १९४०/२२ दिनांक ३० जानेवारी १९९० |
| ३ | **योजनेची रुपरेषा (उद्दिष्टे)** | ग्रामीण भारताच्या मूळ स्वरुपाला बाधान आणता, गावोगावी सगळया सुखसोई उपलब्ध करुन ग्रामस्थांना स्वत:चे भवितव्य स्वत:च ठरविण्याची संधी उपलब्ध करुन देणे. |
| ४ | **योजनेचे निकष** | १) हरिजन वस्ती २) धरणग्रस्त गांवे ३) ३. घरकुल योजनेखाली नवीन वस्ती.४) दारिद्रय रेषेखालील व्यक्तींसाठी शासनातर्फे ज्या योजना राबविल्या जातात त्या अंतर्गत निर्माण होणाऱ्या नवीन वस्त्या. ५) ज्या गांवांना अथवा वाडया/वसत्या यांना पूर्वी वीजपुरवठा झालेलाच नव्हता अशी गावे/ वाडया वस्त्या. |
| ५ | **लाभार्थी** | ग्रामपंचायत |
| ६ | **कार्यान्वीत यंत्रणा** | महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ |
| ७ | **निधीचे स्त्रोत** | राज्य शासन. |

**४) पंचायत राज सशक्तीकरण योजना.**

| अ.क्र. | बाब | योजनेची माहिती |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नाव** | पंचायत सशक्तीकरण पुरस्कार,राष्ट्रीय गौरव ग्राम पुरस्कार, मनरेगा पुरस्कार सन २०१५-१६ या वर्षातील सन २०१७ साठी नामांकने केंद्र शासनास पाठविणेबाबत. |
| २ | **योजनेचे उद्दिष्टे** | १. या अभियानच्या माध्यमातून प्रभावीपणे काम न करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थाही निश्‍चित करणे आवश्यक आहे. अशा संस्थावर विशेष लक्ष देऊन त्यांना प्रोत्साहनपर व योग्य मार्गदर्शन करुन पुढिल वर्षाच्या अभियानामध्ये प्रभावीपणे काम करण्यासाठी प्रेरित करणे.<br>२. ग्रामसभांना सक्षम करणे व निर्णय प्रक्रियेमध्ये लोकांचा सहभाग वाढविणे.<br>**३.** ग्रामसभेच्या माध्यमातून आर्थिक व सामाजिक विकास घडविणे. |
| ३ | **योजनेचे निकष** | केंद्र शासनाला नामनिर्देशित करावयाच्या पंचायत राज संस्थांच्या निवडीची कार्यपध्दती.<br>या पुरस्कारासाठी जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत या तिन्ही संस्था नामनिर्देशन करु शकतात. हे पुरस्कार दोन संवर्गातून देय राहतील.<br>१) सर्वसाधारण २) विषय निहाय<br>सर्वसाधारण प्रश्नावली संबंधित पंचायत राज संस्थेस पूर्ण भरणे बंधनकारक राहील. सर्वसाधरण संवर्गातील बक्षिसासांठी १०० गुणांची प्रश्नावली निश्‍चित करण्यात आलेली आहे. |
| ४ | **योजनेचे लाभ** | विषय निहाय संवर्गातील बक्षिसासाठी एकुण नऊ विषय केंद्र शासनाने निश्‍चित केले आहे.<br>१) स्वच्छता २) नागरी सुविधा (पिण्याचे पाणी, पथदिवे, पायाभूत संविधा इ.)<br>३) नैसर्गिक साधन संपतीचे व्यवस्थापन.<br>४) दुर्लक्षित घटक ( महिला, अनुसूचित जाती/जमाती, अपंग)<br>५) सामाजिक क्षेत्रातील कामगिरी ६) आपत्ती व्यवस्थापन<br>७) उत्पन्न वाढिकरिता नाविन्यपुर्ण उपक्रम<br>८) ग्रामपंचायतीला विकसित करण्यासाठी स्वछेने काम करणाऱ्या व्यक्ती/ संस्था ९) ई- गर्व्हनर. |
| ५ | **निवड कार्यपध्दती** | १. प्रत्येक विषय निहाय सवंर्गासाठी केंद्र शासनाने २० गुणांची प्रश्नावली निश्‍चित केलेली आहे. विषयनिहाय संवर्गातील बक्षिसासाठी पंचायत राज संस्थेस नामनिर्देशन करावयाचे असल्यास त्या पंचायत राज संस्थेचे मूल्यमापन १२० गुणांमधून केले जाईल.<br>२. सदर प्रश्नावली ग्रामपंचायतींना देण्यात आलेल्या पासवर्ड व युजर आयडी, चा वापर करुन ऑनलाईन भरणे आवश्यक आहे.<br>३. प्राप्त प्रस्तावांची छानननी करुन ३ पंचायत राज संस्थांच्या नामनिर्देशन व पंचायत समितीचे २ प्रस्ताव, जिल्हा परिषदेचे १ प्रस्ताव विभागीय कार्यालयास सादर करावे. |
| ६ | **लाभार्थी** | ग्रामपंचायत |
| ७ | **कार्यान्वीत यंत्रणा** | ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद गोंदिया |
| ८ | **निधीचे स्त्रोत** | केंद्र शासन. |

**५) चौदावा वित्त आयोग माहीती**

| अ.क्र. | बाब | योजनेची माहिती |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नाव** | चौदाव्या केंद्रिंय वित्त आयोगाअंतर्गत राज्यातील ग्रामिण स्थानिक स्वराज्य संस्थांना सन २०१५-१६ या आर्थिक वर्षापासुन अनुदान उपलब्ध करुन देणे. |
| २ | **योजनेची रुपरेषा** | चौदाव्या केंद्रिंय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार दिनांक १ एप्रिल,२०१५ ते ३१ मार्च,२०२० या कालखंडात केंद्र शासनाकडुन राज्यातील ग्रामिण स्थानिक स्वराज्य संस्थांना बळकटीकरणासाठी राज्याला बेसिक ग्रॅट व परफामन्स ग्रॅट या २ प्रकारच्या ग्रॅटच्या स्वरुपात अनुदान उपलब्ध करुन देणे. गावपातळीवर पायाभुत सुविधावर निधी खर्च करुन मानवविकासांच्या विविध बाबीवर निधीचा विनियोग वाढविणे. तसेच आमचा गाव आमचा विकास या योजनेची प्राप्त निधीमधुन अमंलबजावणी करणे. |
| ३ | **योजनेचे निकष** | चौदाव्या केंद्रिंय वित्त आयोगाच्या निधीमधुन महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ४५ मधील ग्रामसुचीप्रमाणे ग्रामपंचायतीकडे सोपविण्यात आलेल्या मुलभुत सेवा नियमितपणे व प्रभावीपणे देण्यासाठी निधीचा वापर करणे. त्याकरिता खालील प्रमाणे पायाभुत सुविधा प्रकल्पावर ग्रामपंचातींने प्राधान्य क्रमाणे खर्च करावयाचे आहे. |
| ४ | **निधी मर्यादा** | चौदाव्या केंद्रिंय वित्त आयोगाच्या जनरल बेसिक ग्रॅटच्या वाटपाचे निकष वेळोवेळी प्राप्त झालेल्या निधीचे हप्त्यांचे, जणगणणा २०११ नुसार ग्रा.प.लोकसंख्येवर ९०% व ग्रामिण क्षेत्रफळावर १०% ग्रा.प.निधी वितरण केले जाते. |
| ५ | **कार्यरत यंत्रना** | ग्रामपंचायत |
| ६ | **कामांचे स्वरुप** | १. पिण्याचे पाणी संदर्भातील बाबी :- यामध्ये पाणीपुरवठा स्त्रोत विकास, साधनांची दुरुस्ती, सोलर पंप, आरओ पाणी प्रणाली, पाणी शुध्दीकरण प्रकल्प, दुर्बल घटकासांठी पाणी पुरवठा योजना विस्तार, हातपंपाची दुरुस्ती व देखभालयांचा समावेश आहे.<br>२. स्वच्छतेशी संबंधित बाबी:- यामध्ये घनकचरा व्यवस्थापन जसे लहान ट्रक्टर, ट्राली, कचरा गोळा करण्याची साधन सामुग्री, घनकचरा प्रक्रिया खतनिर्मिती, पेव्हर ब्लॅक, सोसखडडे यांचा समावेश आहे.<br>३. ग्रामपंचायत भवन व आंगणवाडी बांधकाम.<br>४. सार्वजनिक रस्त्यावर एल. ई. डी/सोलर दिव्याचा वापर व देखभाल दुरुस्ती.<br>५. ग्रामपंचायतींच्या मालमत्तेत सुधारणाकरण्यासाठी आवश्यक देखभाल दुरुस्ती करणे. |
| ७ | **निधीचे स्त्रोत** | केंद्र शासन |

**६) अल्पसंख्याक योजना**

| अ.क्र. | बाब | योजनेची माहिती |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नाव** | जिल्हयाती अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रात मुलभूत/ पायाभूत सुविधा उपलब्ध देण्यासाठी क्षेत्रविकास कार्यक्रम. |
| २ | **योजनेची रुपरेषा** | सन २०१३-१४ या वर्षापासुन राज्यातील ज्या ग्रामीण भागात अल्पसंख्याकांची लोकसंख्या लक्षणीय आहे, अशा ग्रामीण भागात मुलभूत / पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देऊन या भागात वास्तव्यास असलेल्या अल्पसंख्याक नागरीकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी अल्पसंख्याक बहुल ग्रामपंचायत क्षेत्र विकास कार्यक्रम कार्यान्वित करण्यात आलेला आहे. |
| ३ | **योजनेचे निकष** | ग्रामपंचायतीच्या एकुण लोकसंख्येपैकी अल्पसंख्याक समूहाची (मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, जैन व पारसी) लोकसंख्या किमाण १०० किंवा त्यापेक्षा जास्त आहे अशा ग्रामपंचायती. |
| ४ | **निधी मर्यादा** | प्रति ग्रामपंचायत कमाल रु.१०.०० लक्ष इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल. |
| ५ | **कार्यरत यंत्रना** | ग्रामपंचायत विभाग जिल्हा परिषद गोंदिया. |
| ६ | **कामांचे स्वरुप** | १) कब्रस्तान/स्मशान/अंत्यविधीच्या जागेसाठी संरक्षक भिंत (४ फुट उंची व १ फुट रुंदी), पाणी सुविधा, विद्युत पुरवठा व अंतर्गत ३ फुट रुंदीचा रस्ता.<br>२) सार्वजनिक सभागृह/शादीखाना हॉल.<br>३) पिण्याच्या पाण्याची सुविधा/ विद्युत पुरवठा/इदगॉह/ सांडपाणी व्यवस्था/ अंतर्गत रस्ते/ पथदिवे/ सार्वजनिक स्वच्छतागृहे. |
| ७ | **निधीचे स्त्रोत** | राज्य शासन |
| ८ | **प्रस्ताव व कालावधी** | अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय दिनांक २२ सप्टेंबर २०१४ मधील प्रपत्र अ मध्ये, माहे ऑक्टोंबर अखेर संपुर्ण परिपुर्ण प्रस्ताव अंदाजपत्रकासह जि.प.ला सादर करणे. |

**७) जैव विविधता व्यवस्थापन समिती.**

| अ.क्र. | बाब | योजनेची माहिती |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नाव** | स्थानिक संस्थामध्ये जैविक विविधता व्यवस्थापन समितीची स्थापना करणे. |
| २ | **योजनेची रुपरेषा** | जैविक विविधतेमध्ये पृथ्वीवरील सर्व सजिवांची विविधता समाविष्ट आहे. जगातील १२ बृहत् विविधता देशामधील भारत हा एक देश आहे, जगाच्या अवघे २.४२% क्षेत्र फळ असलेल्या भारतामध्ये जागतीक प्रजातीपैकी ७.८% प्रजातींची नोंद झालेली आहे.<br>अनौपचारीक तसेच सिध्द दोन्ही प्रकारच्या पारंपारीक व स्वदेशी ज्ञानाच्या बाबतीत ही भारत समृध्द आहे, दि. ५ जून, १९९२ रोजी रिओ-दि-जानेरो येथे जैवविविधते बद्दलच्या संयुक्त राष्ट्र संघ करारावर स्वाक्षरी झालेला भारत एक घटक पक्ष आहे. सदरचा करार दि. २९ डिसेंबर १९९३ पासून अंमलात आला आहे.<br>त्यानुषंगाने केंद्र शासनाने जैविक विविधता कायदा २००२ पारीत केला आहे, त्यानंतर महाराष्ट्र शासनाचा व महसूल व वन विभागाने अधिसुचना दि.१० डिसेंबर, २००८ अन्वये महाराष्ट्र जैविक विविधता नियम, २००८ अधिसुचित केले आहे. |
| ३ | **योजनेचे निकष** | **१) जिल्हा परिषद स्तर, २) पंचायत समिती स्तर व ३) ग्रामपंचायत स्तर**<br>या समितीमध्ये आमसभेच्या माध्यमातून स्वराज्य संस्थेच्या सदस्यामधून ७ व्यक्ती नामनिर्देशीत केल्या जातील. शक्यते नामनिर्देशित व्यक्ती शेती, मासेमारी, गौण वनउपज, पशूपालन इत्यादी क्षेत्रातील जाणकार असावेत. त्यापैकी एक तृतीयांश (१/३) महिला सदस्य असावेत, ज्या ठिकानी अनुसूचित जाती/ जमातीच्या सदस्याचे प्रमाण हे जेथे अशी समिती स्थापन केली असेल त्या जिल्हयातील इतर लोकसंख्येशी अनुसूचित जाती/ जमातीच्या लोकसंख्येचे प्रमाण असेल जवळपास तितकेच प्रमाण असेल. वरील सर्व सदस्य हे स्थानिक संस्थेच्या हद्दतीतील असावेत व त्या क्षेत्राच्या मतदार यादीत त्यांचे नाव नोंदविले असावेत.<br>समितीच्या अध्यक्षाची निवड स्थानिक संस्थेच्या अध्यक्षाच्या अध्यक्षतेखाली करण्यात यावी. जसे जि.प. अध्यक्ष/ पं.स.सभापती/ ग्रा.प.सरपंच.<br>निमंत्रीत सदस्य म्हणून वन, कृषि, पशुधन, आरोग्य, मत्स्यव्यवसाय, शिक्षण व आदिवासी इत्यादी शासकीय विभागाचे स्थानिक स्तरावरील कार्यरत अधिकारी निमंत्रीत सदस्य करता येतील.<br>समितीचा कार्यकाळ हा स्थानिक संस्थेच्या कार्यकाळानूसार असेल.<br>विधान सभेचे स्थानिक सदस्य व संसद सदस्य हे जि.प. व पं.स. स्तरावर गठीत केलेल्या जैविक विविधता व्यवस्थापन समितीच्या बैठकीमध्ये विशेष निमंत्रीत सदस्य असतील तर ग्रामपंचायत स्तरावर जि.प. सदस्य व पं.स. सदस्य हे विशेष निमंत्रीत सदस्य असतील. |
| ४ | **निधी मर्यादा** | - |
| ५ | **कार्यरत यंत्रना** | जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत. |
| ६ | **कामांचे स्वरुप** | जैव जिव जंतू यांचे सरंक्षण |
| ७ | **निधीचे स्त्रोत** | केंद्र शासन |

**८) गावासाठी ऊर्जा कार्यक्षम पथदिवे योजना.**

| अ.क्र. | बाब | योजनेची माहिती |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नाव** | गावासाठी उर्जा कार्यक्षम पथदिवे योजना अंतर्गत सौर पथदिवे, LED लाईट प्रस्तावित करणे. |
| २ | **योजनेची रुपरेषा** | गावातील पथदिव्यात ५०-६०% विज बचत करणेसाठी CFL ऐवजी LED पथदिवे लावने, LED दिव्याचे आयुष्यमान देखील ५०,००० ते १,००,००० तास ऐवढे असल्याने वारंवार दिवा बदलण्याची गरज भासणार नाही म्हणून दिनांक २९ फेब्रुवारी, २०१६ च्या शासन निर्णयान्वये सदर योजनेत अंशत: बदल करुन CFL ऐवजी LED पथदिवे बसविण्याची योजना राबविण्यात येत आहे. |
| ३ | **योजनेचे निकष** | सदर योजनेची अंमलबजावणी ५००० हजार व त्यावरील लोकसंख्या असलेली गावे, शासनाच्या विविध योजना उदा. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजना, तंटा मुक्त गांव, जलयुक्त शिवार योजना, हागनदारी मुक्त गांव इत्यादी मध्ये उत्फूर्तपणे सहभागी घेतलेल्या गावांमध्ये प्राथम्याने करण्यात यावी. |
| ४ | **निधी मर्यादा** | प्रती LED लाईट करीता निधी ९०% महाऊर्जा विकास अभिकरण यांच्याकडून व उर्वरीत १०% निधी ग्रामपंचायत स्वत:च्या उत्पन्नातून खर्च करेल. |
| ५ | **कार्यरत यंत्रना** | ग्रामपंचायत विभाग जिल्हा परिषद गोंदिया |
| ६ | **निधीचे स्त्रोत** | राज्य शासन |

**जिल्हा परिषद गोंदिया, ग्रामपंचायत विभाग अंतर्गत**
**राबविण्यात येत असलेल्या योजनेबाबत माहिती**

**योजनेचे नांव - जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) " ग्रामपंचायतींना जनसुविधेसाठी विशेष अनुदान "**

**प्रस्ताविक -**

ग्रामिण भागातील ज्या गावात दहन/दफन भूमीसाठी ग्रामपंचायतींच्या नि शासनाच्या मालकिची जमिन उपलब्ध नसेल अशा गावांच्या बाबतीत खाजगी जमिन संपन्न करण्यासाठी ग्रामिण भागात दहन/दफन भूमीची मागणी व यासाठी लागणाऱ्या इतर अनुषंगीक सोयी सुविधा उपलब्ध करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या मागणीच्या अनुषंगाने नियोजन विभागामार्फत जिल्हा परिषदेस निधी उपलब्ध करण्यात येतो.

**कामे -**

**अ) ग्रामिण भागात दहन/दफन भूमीची व्यावस्था करणे, त्या सुस्थितीत ठेवणे यासाठी स्मशान भूमीवर घ्यावयाची कामे :-**

१) दहन/दफन भूसंपादन
२) चबुतऱ्याचे बांधकाम
३) शेडचे बांधकाम
४) पोहोच रस्ता
५) गरजेनुसार कुंपन व भिंती घालुन जागेची सुरक्षितता साधणे
६) दहन/दफन भूमीत विद्युतीकरण व आवश्यकतेनूसार विद्युत वाहिनी/सुधारीत शवदाहिनी व्यावस्था
७) पाण्याची सोय
८) स्मृती उद्यान
९) स्मशान घाट/नदी घाट बांधकाम (स्मशान भूमीसाठी आवश्यक तेवढे)
१०) जमिन सपाटीकरण व तळफरशी

**ब) ग्रामपंचायत भवन / कार्यालय याबाबत हाती घ्यावयाची कामे :-**

१) नविन ग्रामपंचायत इमारत बांधकाम व इमारती अंतर्गत सुविधा
२) जुन्या ग्रामपंचायत इमारतींची पुनर्रबांधणी / विस्तार
३) ग्रामपंचायतींच्या आवारामध्ये वृक्षारोपन, परिसर सुधारणा, परिसराला कुंपन घालणे व इतर अनुषांगीक कामे

**निधीची उपलब्धता -**

जिल्हा नियोजन समितीमार्फत जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत निधीची तरतूद करण्यात येईल.

**कामांना मंजूरी -**

१) सदर योजनेअंतर्गत हाती घ्यावयाच्या कामांचा समावेश गांव नियोजन आराखडयात असणे आवश्यक आहे.
२) या योजनेअंतर्गत प्रत्येक कामास प्रशासकिय मान्यता ग्रामसभेच्या सहमतीनंतर ग्रामपंचायत देईल.
३) योजनेअंतर्गत कामास तांत्रिक मान्यता मात्र शासन निर्णय दिनांक १५ जुलै, २००८ अनुसार सक्षम अधिकाऱ्यामार्फत देण्यात येईल.
४) सदर योजनेअंतर्गत कामांची निवड जिल्हा नियोजन समितीमार्फत करण्यात येईल.

**देखभाल व दुरुस्ती -**

सदर योजनेअंतर्गत निर्माण करण्यात आलेल्या सुविधांची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी संबंधीत ग्रामपंचायतची राहील.

## जिल्हा परिषद गोंदिया, ग्रामपंचायत विभाग अंतर्गत
## राबविण्यात येत असलेल्या योजनेबाबत माहिती

**योजनेचे नांव - जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) " मोठया ग्रामपंचायतींना नागरी सुविधेसाठी विशेष अनुदान "**

**प्रस्ताविक -**

जिल्हयातील ५००० लोकसंख्येच्या वरील ग्रामपंचायतींचा नियोजनबध्द विकास करुन या गावांना विकास केंद्र म्हणून विकसीत करतांना ग्रामविकास व पर्यावरण आराखडा तयार करुन त्यांच्या अमलबजावणीसाठी तसेच, खालील अतिरिक्त सुविधा या योजनेअंतर्गत देणे आवश्यक आहे. नियोजनबध्द विकास, बाजारपेट विकास, सार्वजनिक दिवाबत्तीची सोय, बागबगीचे, उद्याने तयार करणे, अभ्यास केंद्र या अतिरिक्त सुविधा या योजनेअंतर्गत देणे आवश्यक आहे.

**कामे -**

१) **नियोजनबध्द विकास :-**
ग्रामविकास आराखडा व पर्यावरण विकास आराखडा तयार करणे,तज्ञ सेवा उपलब्ध करुन देणे, विविध सार्वजानिक सुविधांची जागा संपादीत करणे किंवा विकत घेणे, सुविधांचा सुनियोजित विकास करणे

२) **बाजारपेठ विकास :-**
मोठया गांवाना विकसीत करतांना अद्यावत व सुसज्ज बाजारपेट विकसीत करणे,बाजारपेठांचे नियोजन व बांधकाम करणे, त्यासाठी जागा अधिग्रहण करणे / विकात घेणे, त्यांचा विकास करणे,बाजार कट्टयांचे बांधकाम करणे, दिवाबत्तीची, पिण्याचे पाणी, इत्यादी सर्व सुविधांचा समावेश करणे.

३) **सार्वजनिक दिवाबत्तीची सोय :-**
दिवाबत्तीची सोय करण्यासाठी जादा विद्युतखांब आवश्यक असलेस विद्युत मंडळाकडे त्यासाठी रककम भरणे यास्तव, अशा ग्रामपंचायतींना अनुदान अदा करण्यासाठी देता येईल. इतर प्रकारच्या अपारंपारिक उर्जा वापराच्या दिव्यांसाठी (सौरिदिवे, एल.ई. डी दिवे), वायरिंग व त्या अनुषंगीक खर्चासाठी हे अनुदान वापरण्यात येईल.

४) **बागबगीचे, उद्याने तयार करणे :-**
गावात बागबगीचे व उद्यान, गावातील चौकांचे सुशोभिकरण करण्यासाठी या योजनेतून अनुदान वापरण्यात येईल.

५) **अभ्यास केंद्राचे बांधकाम :-**
मोठया गावातील विद्यार्थांसाठी अभ्यास केंद्राचे बांधकाम करणे, टेबल व खुर्च्यांची व्यवस्था करणे, दिवाबत्तीची व्यवस्था करणे इत्यादी सुविधा पुरविता येईल.

६) **गावाअंतर्गत रस्ते करणे :-**

७) **सांडपाणी व्यवस्थापनासाठी भूमीगत नाल्यांचे बांधकाम करणे :-**

**निधी उपलब्धता -**

ज्या ग्रामपंचायती पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजनेत सहभागी होवून त्या योजनेच्या निकषाची पूर्तता केली असेल त्यामधूनच जिल्हा नियोजन समिती मार्फत जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत निधीची तरतूद करण्यात येईल.

**अंमलबजावणी -**

या योजनेअंतर्गत ग्रामपंचायतींने आराखडा तयार करुन त्यास ग्रामसभेची प्रशासकिय मान्यता घ्यावी.

**तांत्रिक मान्यता -**

ग्रामपंचायतने तयार केलेल्या आराखडयास कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद यांची तांत्रिक मान्यता घेण्यात यावी.

**देखभाल व दुरुस्ती -**

सदर योजनेअंतर्गत निर्माण करण्यात आलेल्या सुविधांची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी संबंधीत ग्रामपंचायतची राहील.